# Matrumandir-Devrukh

# Dedicated
# Covid Health center (DCHC)

Daily

# Bulletin

24.5.21

संपर्क : -   SMS हॉस्पिटल
7798241390 / 02354260026

# MATRUMANDIR DCHC

## Daily Patient Update

**24.05.21**

| | Total Capacity | Total Occupancy | Available Beds |
|---|---|---|---|
| Total Beds | 30 | 15 | 15 |
| With O2 | 8 | 5 | 3 |
| Without O2 | 13 | 3 | 10 |
| Icu beds | 9 | 7 | 2 |
| Ventilators | 0 | 0 | 0 |



# मातृमंदिरचा अपना परिवार

गेल्या अनेक दशकापासून मातृमंदिर संस्थेशी अत्यंत जिव्हाळ्याचे आणि आपलेपणाचे कौटुंबिक नाते असणारा एक मोठा परिवार आहे तो अपना परिवार. मावशीं ते नारकरभाऊ यांच्या काळात हे नाते दृढ झाले.

त्यातील एक अत्यंत सन्माननिय व्यक्तिमत्व मा. दत्ताराम चाळके . कोविड केअर सेंटर प्रकल्पाची घोषणा करताच त्यांचा पहिला फोन आला आणि त्यांनी विचारले अभिजित तुला तातडीने कोणत्या गोष्टींची गरज आहे. माझे उत्तर होते, ऑक्सीजन कॉन्सेन्ट्रटर ,आणि क्षणाचाही विलंब न करता त्यांनी सौ . मेघनाताई यांच्या खात्यातून १,२५,०००/- ची देणगी मातृमंदिरला पाठविली. हा अनुभवच अत्यंत विलक्षण, उर्जशिल आणि आमचा उत्साह द्विगुणीत करणारा होता.

मातृमंदिर या सामाजिक संस्थेला मुंबईकर कोकणवासीयांचा नेहमीच मोठा आधार असतो. रोजगारा निमित्ताने मुंबईत असणार्या कोकणी माणसाचे कोकणातील आरोग्य, पाणी , शिक्षण यासुविधा मिळण्यासाठी सतत एक तळमळ असते. आणि संधी मिळेल त्या प्रमाणे तो आपल्या गावात, तालूक्यात, जिल्ह्यात त्यासाठी सदैव प्रयत्नशील असतो.

# MATRUMANDIR DCHC

मा. दत्ताराम चाळके हे असेच एक अत्यंत कुशाग्र , चतुरस्त्र व्यवस्थापकीय क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व आहे. शासकीय उच्च पदावर आणि फार मोठ्या पगारावर काम करतांना व्हॉलेंटरी रिटायर्डमेंट घेत त्यांनी आर्थिक व्यवस्थापन क्षेत्रातील सामाजिक कार्यात झोकून दिले. समाजवादी चळवळीशी संलग्न अपना सहकारी बँकेच्या चेअरमनपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली आणि सहकारी क्षेत्रात अपना बॅकेला त्यांनी सर्वोत्तम स्थरावर नेले. १३ शाखांतील बँक ८५ शाखांवर झेपावत ६५ हजार कोटींची उलाढाल करणारी मल्टीस्टेट शेड्यूल बँक म्हणून सर्वोत्तम झाली. बृहनमुंबई नागरी सहकारी बँक असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष आणि विद्यमान संचालक आहेत. देशांतील सहकारी बँकाचे नॅशनल फेडरेशन या नॅबकॅफ दिल्लीचे संचालक आहेत. देशातून सर्वाधिक मतांनी ते या संचालक पदावर निवडून गेले . सेंट्रल गव्हर्मेंट आणि आरबीआय यांच्या राष्ट्रीय धोरणात महाराष्ट्रातील सहकारी बँकांच्या समस्या संदर्भात मांडणी करणारा एक प्रमुख आवाज म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. असे चाळके साहेब आणि अपना बँक परिवार हा मातृमंदिरच्या आरोग्य आणि सामाजिक कार्यातील एक मोठा हक्काचा आधार आहे.

# MATRUMANDIR DCHC

या पुर्वी विशेषत: मी कार्याध्यक्ष झाल्यानंतर संस्थेची आर्थिक परिस्थिती फारच अडचणीची होती. ६-६ महिने कर्मचार्यांचे पगार होत नव्हते. गोकुळ मधील मुलींचे रोजच्या व्यवस्थापनासाठी निधी नव्हता. अखेर निधी संकलनाचा उपक्रम म्हणून भीमराव पांचाळे यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम ठेवला आणि चाळके साहेबांना आपण बँकेमार्फत आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन केले . यावेळी अपना बँकेकडून ५ लाखांचा निधी देत त्यांनी गोकुळ बालगृहाला खरा आधार दिला. त्या नंतरही त्यांनी व्यक्तिगत पातळीवर मोठ्या रकमा देऊन सहकार्य केले.

चाळके यांचे मुळ गाव कर्ली , संगमेश्वर तालुक्यांतील, मुंबईत असले तरी त्यांचे मन गावाकडच्या सामाजिक वातावरणात रमलेले म्हणूनच रत्नागिरी जिल्ह्यात अपना बँकेची पहिली शाखा देवरुख येथे सुरु केली. येथील महिला बचत गटांसाठी आर्थिक सहकार्याच्या विविध योजना राबवत त्यांच्या सबलीकरणाचे प्रयत्न ते करत रहातात.

संगमेश्वर तालुक्यांतील आरोग्य सुविधांचा अभाव त्यांना अस्वस्थ करतो. यासाठी मातृमंदिरने येथे अद्ययावत हॉस्पिटल सुविधा द्यावी हे त्यांचे स्वप्न आहे. अपना बँक परिवारातील एक जेष्ठ प्रतिनिधी असे स्वप्न पहातात त्यावेळी त्याच्या वास्तवाचे परिमाण अधिक असते. हे नाते चाळके साहेब अधिक वृध्दिगत करत आहेत. अपना बँक, अपना बँक परिवाराचे मातृमंदिर मनापासून स्वागत करत आहे.

**अभिजित हेगशेटये**
**कार्याध्यक्ष**

**Thank You**

# MATRUMANDIR DCHC



चिपळूण येथील समाजिक कार्यकर्त्या स्मृती राणे यांनी त्यांच्या ‘जिवाजी बाबुराव राणे स्मृती प्रतिष्ठानतर्फे’ ऑक्सिमीटर, PPE कीट आणि vaporizer ची मदत दिली. चिपळूण परिसरातील महिलांच्या सबलीकरणाचे स्वप्न घेवून महिलांना आर्थिक सबलता देणारे आवश्यक उपक्रम त्या राबवत आहेत. अनेक सामाजिक संस्था-संघटनांसोबत काम करत प्रतिष्ठान तर्फे अनेक संस्थांना आवश्यक मदतही केली जाते. मा.आमदार शेखरजी निकम यांच्या सूचनेप्रमाणे त्यांनी मातृमंदिरला काही दिवसांपूर्वी भेट दिली होती.त्यावेळी सांगितल्या प्रमाणे सदर मदत त्यांनी दिलीच पण महत्वाचे म्हणजे हि मदत देण्यासाठी चिपळूणवरून स्वतः गाडी चालवत इथपर्यंत आल्या.

मातृमंदिर परिवारातर्फे खूप खूप आभार .

**Thank You**

# MATRUMANDIR DCHC




केमिस्ट व ड्रगीस्ट असोशियनचे राष्ट्रीय पातळीवरचे सदस्य तसेच मातृमंदिरचे स्वीकृत सदस्य वैजनाथ जागुष्टे यांनी ‘डीसेंट वीणा’ मेडिकल, बॉम्बे स्टोर्स च्या माध्यमातून गरीब रुग्णांसाठी आवश्यक औषधांची मदत पाठवली .

आपल्या DCHC मध्ये भरती झालेल्या रूग्णाना योग्य मोबदल्यामध्ये उपचार मिळत आहेतच परंतु औषधोपचार खर्चाचा मोठा भार रुग्णांवर पडतो. इथली हि परिस्थिती कळल्यावर जागुष्टे यांनी आवश्यक औषधे तातडीने पाठवली तसेच असोशिएशनच्या माध्यमातून शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर मदतीसाठी प्रयत्नही करत आहेत.

**Thank You**

# मातृमंदिर समुपदेशन केंद्राला 'सुकून' चा मदतीचा हात

कोविड रुग्णांना योग्य उपचार होत असतानाच रुग्णाचे नातेवाईक, कोविड सेंटर मध्ये काम करणारा स्टाफ या सर्वांनाच जाणवणारा ताण, नैराश्य याचा प्रश्नही मोठा होत जातोय. करोनाच्या भितीसह अनेक भावनिक, सामाजिक व आर्थिक आव्हानांचा सामना करताना या प्रमुख घटकांचे मानसिक आरोग्य धोक्यात येते आहे.

यासाठीच '**रत्नागिरी असोशीएशन ऑफ मेंटल प्रोफेशनल्स**' च्या माध्यमातून '**सुकून**' हा उपक्रम राबवला जातोय. याचाच एक भाग म्हणून मातृमंदिर समुपदेशन केंद्रामध्ये रुग्णांचे नातेवाईक, फॉलोअप साठी आलेले पेशंट आणि आवश्यकतेनुसार हॉस्पिटल स्टाफ यांच्यासाठी डॉ.विद्या मोहिरे दर सोमवारी उपलब्ध असतील.





MATRUMANDIR DCHC

# MATRUMANDIR DCHC



जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मानित

# मातृमंदिर देवरुख

स्थापना १९५४

## मातृमंदिर कोविड केअर सेंटर – मदतीचे आवाहन

**देवरुख परिसरातील ५० पेक्षा अधिक गावांना कोविड आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकिय साधनांची गरज आहे**

* बेड/आयसीयू बेड – २०
* मॉनिटर – ६
* ऑक्सीजन कॉन्सेंट्रेटर
* औषधे
* बायपॅप मशीनस्
* रुग्ण भोजन व्यवस्था/सामग्री
* ऑक्सीमीटर

आपण आर्थिक स्वरूपातील मदतीसह वस्तूंची मदत संस्थेला करावी. आपली मदत मोलाची ठरणार आहे. आर्थिक मदतीला ८०जी अंतर्गत आयकरात सुट मिळेल.

## रुग्णांना मोफत जेवण आणि आरोग्य सुविधा

आपली आर्थिक मदत आमच्यापर्यंत पोहचण्यासाठी
बँक डिटेल्स्

**अपना सहकारी बँक लि.**

शाखा – देवरुख

बचत खाते क्र. – 029011100004197

IFSC - ASBL0000029



संपर्क

अभिजित हेगशेटये (कार्याध्यक्ष)

आत्माराम मेस्त्री (कार्यवाह)

मातृमंदिर, देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

www.matrumandirdevrukh.org

Phone : 94220 52314 / 94224 30809